**श्री. सर्जेराव शंकर भारती,तत्कालीन वरिष्ठ सहाय्यक, पं.स.अहमदनगर,यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने शिस्तभंगाची कारवाई करणे बाबत.**

अहमदनगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश जा.क्र.साप्रवि-१/अस्था-३/ ८२८ /२०२१
अहमदनगर दिनांक ०८/११/२०२१

संदर्भः- १.इकडील दोषारोप पत्र क्रं.आस्था३/१७६७/२०१६,दिनांक २२/१२/२०१६
२.दोषारोपाचे अनुषंगाने आपला खुलासा दिनांक ०७/०१/२०१७
३.इकडील आदेश क्रं.आस्था३/८३/२०१७,दिनांक १७/०१/२०१७
४.इकडील आदेश क्रं.आस्था३/९१/२०१७,दिनांक १७/०१/२०१७
५.मा.सहाय्यक आयुक्त(चौकशी)नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्रं.विशा-४/खाचौ/सी.आर./३५/२०१७, दि.१७ जानेवारी २०२१
६.गटविकास अधिकारी,पं.स.अहमदनगर यांचेकडील अपहारीत रक्कम भरणा केलेबाबत पत्र क्र.वशि/आस्था१/३९४/२०२१ दि.०९/०७/२०२१
७.इकडील अंतिम कारणे दाखवा नोटिस क्र.आस्था३/५९८/२०२१ दि.२५/०८/२०२१
८.ग.वि.अ.पं.स.कोपरगांव यांचेकडील पत्र क्र.आस्था१/४३१/२०२१ दि. ०२/०९/२१ अन्वये अंतिम कारणे दाखवा नोटिस दि.०२/०९/२०२१ रोजी बजावलेबाबतची पोहोच
९. ग.वि.अ.पं.स.कोपरगांव यांचेकडील पत्र क्र.आस्था१/५३९/२०२१ दि. २९/०९/२१ अन्वये अंतिम कारणे दाखवा नोटिसीचे अनुषंगाने तुमचा खुलासा दि.२४/०९/२१
१०.ग.वि.अ.,पं.स.अहमदनगर यांचेकडील खुलास्यावरील अभिप्राय पत्र क्र. वशि/आस्था१/६६७/२०२१,दिनांक १३/१०/२०२१

वरील विषयानुसार तुम्ही वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) या पदावर पंचायत समिती अहमदनगर येथे कार्यरत असताना तुमचे कडेस कृषि गोदामाचे साहित्याचा कार्यभार देणेत आलेला होता. त्यानुसार संदर्भ क्रं.१ नुसार कृषि गोदामातील साहित्याची लाभार्थी हिस्याची रक्कम १,१२,६०६/- वेळेवर भरणा न करता सदर रक्कमेचा अपहार करणे,कार्यालयीन कामी विनापरवाना स्वतःचे अधिकारात वारंवार गैरहजर राहून गैरवर्तन करणे व वरिष्ठाचे आदेशाचे पालन न करता कर्तव्यात कसुर करुन कार्यालयीन शिस्तीचा भंग करणे हे आरोप ठेवणेत आले होते.

सदरचे आरोपांचा खुलासा आपण संदर्भ क्रं.२ अन्वये सादर केलेला होता त्यात तुमचेवर ठेवणेत आलेले आरोप अमान्य केलेने न्याय हक्काचे दृष्टीने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम (६) मधील तरतुदीनुसार खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित करणेत आले होते त्यानुसार संदर्भ क्रमांक ३ व ४ नुसार खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करणेत आली.

संदर्भ क्रं. ५ अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग,नाशिक यांचा चौकशी अहवाल प्राप्त आहे.विभागीय चौकशी अहवालामध्ये तुमच्यावर ठेवणेत आलेले तीन ही आरोप सिध्द होत असल्याचे नमुद केले आहे.तसेच संदर्भ क्रमांक ६ अन्वये तुम्ही अपहारीत रक्कमेचा भरणा केलेबाबत चलनाचे प्रतीसह या कार्यालयास अहवाल प्राप्त झालेला आहे.

या कार्यालयाकडील संदर्भ क्र. ७ अन्वयेची विभागीय चौकशीच्या अनुषंगाने अंतिम कारणे दाखवा नोटिस दिनांक ०२/०९/२०२१ रोजी तुम्हांस बजावण्यात आलेबाबत संदर्भ क्र. ८ अन्वये या कार्यालयास पोहोच प्राप्त आहे. संदर्भ क्र. ९ अन्वये तुमचा दिनांक २४/०९/२०२१ चा खुलासा या कार्यालयास प्राप्त आहे.त्याचे अवलोकन केले असता तुम्ही खुलाश्यामध्ये तुम्ही अंतिम कारणे दाखवा नोटिसीचे अनुषंगाने सहाय्यक आयुक्त (चौकशी ) नाशिक विभाग यांचेकडील चौकशी अहवालातील तीनही आरोपाबाबत खुलास सादर केलेला असुन अपहारीत रक्कम कोणतीही शासकीय शिक्षा होवु नये म्हणुन रक्कम रुपये १,१२,६०६/- भरणा केली असुन सक्तीने सेवा निवृत्ती ऐवजी सौम्य शिक्षा देणेत यावी किंवा ऐच्छिक सेवा निवृत्ती मंजूर करुन कोणतीही शिस्तभंगाची कारवाई करणेत येवु नये अशी विनंती केलेली आहे.

तुमच्या खुलास्याचे अनुषंगाने गट विकास अधिकारी,पंचायत समिती अहमदनगर यांचेकडील संदर्भ क्रमांक १० अन्वये अभिप्राय प्राप्त असुन तुमचेवर ठेवण्यात आलेले सर्व तीनही आरोप चौकशी अहवालानुसार सिध्द झालेले आहेत. श्री.भारती यांचे नियमानुसार पुढील कारवाई करणेबाबत कळविले असुन खुलास्याशी असहमती दर्शविलेली आहे. तुमचा खुलासा व गटविकास अधिकारी यांचे खुलास्यावरील अभिप्रायांचे अवलोकन केले असता सादर केलेला खुलासा हा समाधानकारक व संयुक्तीक नाही असे या प्राधिकरणाचे मत आहे. त्यामुळे सदरचा लेखी खुलासा अमान्य करुन तुम्ही कार्यालयीन कामी हलगर्जीपणा व गैरवर्तन करुन महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने शिस्तभंगाची कारवाईस पात्र ठरत आहे. अंतिम कारणे दाखवा नोटीसीमध्ये नमुद केलेली महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (५) मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषद सेवेतुन सक्तीने सेवानिवृत्त करणे ही शिक्षा या आदेशाव्दारे अंतिम करण्यात येत आहे. सदर आदेशाची नोंद संबधिताच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्र. २०२१११०८०४०९६६ असा आहे.

(राजेंद्र क्षीरसागर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,अहमदनगर

प्रति,

**श्री.सर्जेराव शंकर भारती,वरिष्ठ सहाय्यक,पंचायत समिती कोपरगांव जि.अहमदनगर**

व्दारा व प्रत :- गट विकास अधिकारी पंचायत समिती कोपरगांव जि.अहमदनगर

२/- सदरचा आदेश श्री.सर्जेराव शंकर भारती,वरिष्ठ सहाय्यक यांना बजावून दिनांकित स्वाक्षरीसहची प्रत या कार्यालयास सादर करणेत यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करणेत यावा.

प्रत : गट विकास अधिकारी पंचायत समिती अहमदनगर ता.जि.अहमदनगर

प्रत : निवड नस्ती

(राजेंद्र क्षीरसागर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,अहमदनगर